प्रेसनोट दिनांक १५/०३/२०१९

## खडक पोलीस स्टेशन

## नागरिकास सापडलेला मोबाईल फोन पोलीसांचे मदतीने मुळ मालकास परत.

दिनांक १४/०३/२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे, पुणे कडील सी. आर. मोबाईल गाडीवरील कर्मचारी महिला पोलीस हवा. ५२२५ दळवी, पोशि गोसावी, पोशि दळवी असे गोटीराम भैय्या चौकातुन सेव्हनलव्ह चौकाकडे जात असताना, त्यांची सी. आर. मोबाईल गाडी राष्ट्रभुषण चौक, खडकमाळ आळी, पुणे या ठिकाणी आली असता, इसम नामे प्रकाश वरे मो क्र. ९४२१०८०२३६ याने पोलीसांना थांबवुन त्यांना मिळुन आलेला सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन मॉडेल जे५, पोलीसांचे ताब्यात दिला.

नमुद पोलीस कर्मचारी यांनी सदर मोबाईलमधील कॉन्टक लिस्टमधुन मोबाईलचे मुळ मालकाचा शोध घेतला असता, श्री. भरत सोनवणे रा. १५ गुरुवार पेठ, पुणे हे मिळुन आले. त्यांचेकडे सदर मोबाईल फोनबाबत चौकशी करता त्यांनी त्यांचा सॅमसंग कंपनीचा जे ५, किंमत रुपये १२,०००/- चा फोन गहाळ झाला असल्याचे सांगीतले. सदर फोनबाबत त्यांचेकडे खातरजमा करुन मोबाईल फोन त्यांचे ताब्यात सुखरुप परत केलेला आहे.



**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर